International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March -2022, Impact Factor: 7.429, Available online at: www.ijaresm.com

# ग्रामीण विकासाच्या विविध योजना

अशोक रामचंद्र गोरे

समाजशास्त्र विभागप्रमुख
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

-----------------------------------------------------------*****************-----------------------------------------------------------

**प्रास्ताविक**

भारत हा खेड्यांचा देश समजला जातो. भारतीय खेड्यातील लोकांचे जीवनमान अत्यंत साधे, परंतु वैशिष्ट्यपूर्ण आहे. कृषी व्यवसाय हा येथील प्रमुख व्यवसाय आहे. येथील शेती मोठ्या प्रमाणात निसर्गावर अवलंबून आहे. ग्रामीण जीवनाचा इतिहास अतिप्राचीन आहे. जातीव्यवस्थेवर आधारीत सांस्कृतिक विविधता ग्रामीण समुदायात मोठ्या प्रमाणात पहावयास सापडते. भारतातील खेड्यांची संख्या पाच लाखांपेक्षा जास्त आहे. भारतातील ग्रामीण लोकांच्या समस्यांचे प्रमाण आणि तीव्रतादेखील मोठी आहे. येथील सामाजिक समस्यांमध्ये प्रामुख्याने आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, दारिद्य्र जातीयवाद, शिक्षणाचा अभाव, कुपोषण, आरोग्याच्या समस्या, बेकारी, व्यसनाधिनता, स्त्रियांच्या समस्या इत्यादी समस्यांचा समावेश होतो. आधुनिक काळात ग्रामीण पुनर्रचनेची आवश्यकता प्रतिपादन केली जाते. समस्या विरहित खेड्यांची कल्पना मांडली जात आहे. ग्रामीण सामाजिक समस्यांची सोडवणूक करण्यासाठी तसेच ग्रामीण सामाजिक विकास व परिवर्तनाला गतीमान करणे आवश्यक आहे.

भारतात ग्रामीण भागात वास्तव्य करणारी लोकसंख्या 69 टक्के पेक्षा जास्त आहे. भारताने कल्याणकारी राज्याची भूमिका स्वीकारलेली आहे. विकासाच्या समान संधीचे तत्त्व मान्य करण्यात आले आहे. विविध पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शासन ग्रामीण विकास करण्यासाठी शासनाला विविध योजना राबवाव्या लागतात. ग्रामीण समाजाच्या विकास प्रक्रियेत समाजाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रांचा सर्वांगिण विकास घडवून आणणे हे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत अपेक्षित आणि समाविष्ठ असते. ग्रामीण समाजाच्या समस्यांचे निवारण करणे आणि ग्रामीण सामाजिक जीवन सुधारण्यासाठी विविध उपक्रम, विकघासाभिमुख प्रकल्प आणि विकासाच्या योजना केंद्रशासन आणि राज्य सरकारांकडून राबविल्या जात आहेत. त्यामुळे ग्रामीण विकास ही सार्वत्रिक व सर्वांगीण स्वरुपाची प्रक्रिया आहे.

ग्रामीण विकासाच्या व्यापक संकल्पनेत कृषी सुधारणा, कृषी पूरक व्यवसायांना चालना, ग्रामीण रोजगाराच्या संधीमध्ये वाढ करणे, शैक्षणिक सुविधा, राहण्यासाठी घरे, वाहतुकीच्या सुविधा, जलसिंचन, शुध्द पाणी पुरवठा, नव्या तंत्रज्ञानाचा पुरवठा, सामाजिक प्रबोधन इत्यादींचा समावेश होतो. ग्रामीण विकासाबाबतच्या विविध कार्यक्रमांची आखणी आणि अंमलबजावणी यासाठी समुदाय विकास कार्यक्रम (सी.डी.पी.) आणि एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (आय.आर.डी.पी.) यांचा समावेश होतो.

*** ग्रामीण विकास: अर्थ आणि संकल्पना -**

1) योजना आयोग: “ग्रामीण विकास योजना ही अशी विकास पध्दती आहे की, ज्यामध्ये ग्रामीण लोकांच्या जीवनात अपेक्षित बदल घडविण्यासाठी प्रयतनांच्या सातत्यपूर्ण प्रक्रियेचा समावेश होतो.”
2) जागतिक बँक: “ग्रामीण भागातील लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा करण्यासाठी तयार करण्यात आलेली व्यूहरचना म्हणजे ग्रामीण विकास होय.”

3) कर्ल टेलर: "ग्रामीण विकास ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये ग्रामीण लोक आपली आर्थिक, सामाजिक परिस्थिती सुधारावी यासाठी ज्या प्रक्रियेत सहभागी होतात आणि त्यामुळे ते आपल्या राष्ट्रीय विकासाच्या कार्यक्रमात काम करणारे प्रभावशाली समूह बनवतात."

*** शोधनिबंधाची उद्दिष्टे:-**

1) ग्रामीण विकासाचा अर्थ लक्षात घेणे.
2) ग्रामीण सामाजिक समस्यांचे स्वरुप लक्षात घेणे.
3) ग्रामीण विकासाच्या विविध योजनांचे अध्ययन.
4) ग्रामीण विकासाच्या योजनांचे महत्त्व लक्षात घेणे.

*** शोधनिबंधाची गृहितके:-**

1) ग्रामीण समाजात अनेक सामाजिक समस्या आहेत.
2) ग्रामीण विकास ही संकल्पना व्यापक आहे.
3) ग्रामीण विकासाच्या विविध योजना उपयुक्त आहेत.
4) ग्रामीण विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही.
5) ग्रामीण विकासाच्या योजनांबाबत प्रबोधन आवश्यक आहे.

*** संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम साधनांवर आधारीत आहे. विविध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, विविध नियतकालिके व संकेतस्थळांचा उपयोग करण्यात आला आहे.

## विषय विश्लेषण

भारत हा खेड्यांचा देश आहे. 2011 च्या जनगणनेनुसार जवळपास 69 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्य करीत आहे. शेती, शेतमजूरी आणि छोटे व्यवसाय हे येथील उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे. ग्रामीण विकासासाठी केंद्र सरकार आणि राज्यसरकारांनी वेळोवेळी विविध योजना प्रस्तुत केल्या आहेत. या योजनांचा मुख्य उद्देश गाव आणि व्यक्तींचा विकास करणे हा आहे. ग्रामीण विकासाच्या योजनांमध्ये वेळोवेळी बदल करण्यात आले आहेत. काही प्रमुख योजनांचा आढावा खालील प्रमाणे आहे.

**1) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना :** भारत सरकारने या योजनंचा प्रांरभ 1 एप्रिल 1999 ला केला. निवडक ग्रामीण कुटुंबांच्या कार्यक्षमतेवर आधारीत लघु उद्योगांची स्थापना करणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेसाठी 75 टक्के निधी केंद्र शासन तर 25 टक्के निधी राज्य सरकार देते. दारिद्य्र रेषेखालील, एस.सी., एस.टी., महिला आणि अपंग व्यक्तींना प्राधान्य दिले जाते.

**2) इंदिरा आवास योजना:** 8 इंदिरा आवास योजना 1989 पासून राबवली जात आहे, परंतु 1 जानेवारी 1996 पासून ही योजना स्वतंत्रपणे केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राबविण्यात येत आहे. या योजनेत केंद्रशासन 75 टक्के तर राज्यशासन 25 टक्के निधी देते. या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील दारिद्य्र रेषेखालील बेघर/कच्चे घर असलेल्या कुटुंबासाठी घरकुल बांधणीसाठी अनुदान देण्यात येते. या योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार 60 टक्के निधी अनुसूचित जाती/जमातीसाठी राखून ठेवण्यात येतो.

**3) जवाहर ग्रामसमृध्दी योजना:** पूर्वीच्या जवाहर रोजगार योजनेत संशोधन करून 1 एप्रिल 1999 ला 'जवाहर ग्राम समृध्दी योजना' कार्यान्वित करण्यात आली. ग्रामीण भागात मागणी आधारीत सुविधा उभारून शाश्वत मालमत्ता उभारणे व निरंतर रोजगार उपलब्ध करणारी कायमस्वरुपी साधन सामग्री तयार करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. जवाहर ग्रामसमृध्दी योजना केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या 75ः25 टक्के आर्थिक सहभागातून सुरू करण्यात आली.

**4) राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम:** केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वतीने 15 ऑगस्ट 1995 मध्ये राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. निर्धन, सहाय, वृध्द आणि कुटुंबातील मुख्य सदस्याच्या मृत्यूनंतर लाभ देण्यासाठी या योजनेची आखणी कण्यात आली आहे. या कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दावस्था पेन्शन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विकलांगता पेन्शन योजना राष्ट्रीय परिवार लाभ योजना, अन्नपूर्णा योजना यांचा समावेश आहे.

**5) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना:** या योजनेची सुरूवात 25 डिसेंबर 2000 मध्ये झाली. प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचा मुख्य उद्देश हा सन 2001 च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण क्षेत्रात 1000 पेक्षा जास्त व आदिवासी भागातील 500 पेक्षा जास्त पात्र लोकवस्तीची न जोडलेली गावे बारमाही रस्त्याद्वारे जोडणे हा आहे.

**6) उन्नत कृषी यंत्र योजना:** कृषी उन्नती योजने अंतर्गत कृषी यांत्रिकीकरण उपअभियान 2020-21 ही योजना केंद्र पुरस्कृत योजना आहे. यामध्ये केंद्र शासनाचा 60 टक्के आणि राज्य शासनाचा 40 टक्के सहभाग आहे. या योजनेमध्ये शेतकर्यांना विविध प्रकारच्या औजारांसाठी अनुदान दिले जाते.

**7) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :** सद्यःस्थितीत महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, 1977 (दि.6 ऑगस्ट, 2014 पर्यंत सुधारीत) अंमलात आहे. या कायद्यांतर्गत सदरील योजना सुरू आहे. या योजने अंतर्गत केंद्रशासन 100 दिवस प्रति कुटुंब रोजगाराची हमी देते व त्यासाठी निधी देते. प्रति कुटूंब 100 दिवसावरील प्रत्येक मजुराच्या मजुरीच्या खर्चाचा आर्थिक भार राज्यशासन उचलते. राज्य रोजगार हमी योजनेतील प्रगतीवरील अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता जास्तीत जास्त निधीचा उपयोग करते.

## निष्कर्ष

1) केंद्र शासन आणि राज्य शासनाने वेळोवेळी ग्राम विकासाच्या विविध योजना प्रस्तुत केल्या आहेत.
2) योजनांच्या सुयोग्य अंमलबजावणीसाठी केंद्र शासन राज्यांना ठराविक निधी पुरविते.
3) राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विविध योजना आखल्या जातात.
4) वाढत्या लोकसंख्येमुळे योजनांच्या अंमलबजावणीला मर्यादा येतात.
5) ग्रामीण विकासाच्या विविध योजनांमुळे ग्रामीण समाजात परीवर्तन होत आहे.
6) ग्रामीण विकासाच्या विविध योजनांची अंमलबजावणी पारदर्शक पध्दतीने होणे आवश्यक आहे.

## संदर्भ

1) गोरे अशोक रामचंद्र, ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जून 2014
2) कुलश्रेष्ठ नीतिश, पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजनाएँ, रितु पब्लिकेशन्स, जयपूर, 2012
3) कटार सिंह, ग्रामीण विकास (सिध्दांत, नीतियाँ एवं प्रबंन्ध), रावत पब्लिकेशन्स, जयपूर, 2011
4) प्रसाद गोपीकृष्ण, विकास का समाजशास्त्र, रावत पब्लिकेशन्स, जयपूर, 1999
5) http://mahaeges.maharashtra.gov.in- 07/03/2022
6) https://simdega.nic.in - 07/03/2022
7) https://mr.vikaspedia.in-07/03/2022